नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९६ Issue - 196 | वार शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ Blow- Saturday Date 6 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

२१ तारखेलाच मतमोजणी, सुप्रीम कोर्टाचे निर्देश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांवर अखेर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत स्पष्ट आदेश दिले आहेत. राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने सांगितले. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश देत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेवरील अनिश्चिततेला पूर्णविराम दिला.

२ डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. उच्च न्यायालयांमधील विविध याचिकांचा, प्रकरणांचा किंवा खंडपीठांच्या आदेशांचा परिणाम होऊन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. नागपूर, औरंगाबाद खंडपीठ किंवा मुंबई उच्च न्यायालय असेल, त्यांच्या कोणत्याही आदेशाचा परिणाम निवडणुका लांबण्यावर होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.

निवडणूक आयोगाने ३१ जानेवारीची ही मुदत पाळायला हवी.

या मुदतीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत पुढे ढकलता कामा नयेत. नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ तारखेपूर्वी करण्यास नकार दिला आहे.

२ तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी कोणत्याही परिस्थितीत २१ च्या पुढे ढकलली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने २१ तारखेला होणारी मतमोजणी लवकर घ्यावी अशा स्वरूपाचे आदेश दिलेले नाहीत.

गेल्या काही वर्षांपासून अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे पुढे ढकलल्या जात होत्या. यामुळे नागरिकांमध्ये तसेच जनप्रतिनिधींमध्येही प्रचंड अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या आदेशामुळे आता ही भीती संपुष्टात आली आहे. या आदेशामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला स्पष्ट दिशा मिळाली असून, निवडणुका पुन्हा अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडणार नाहीत, याचा भरोसा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने दिलेली वेळमर्यादा काटेकोरपणे पाळावी, उच्च न्यायालयांनी निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि स्थानिक संस्थांच्या निवडणुका वेळेत पार पडाव्यात, या मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

इंडिगोच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार, केंद्र सरकारकडून गंभीर दखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : इंडिगो एअरलाईनमुळे पुणे, मुंबई, कोलकाता आणि दिल्ली विमानतळावरुन प्रवास करणाऱ्या विमान प्रवाशांची कालपासून मोठी गैरसोय झाल्याचं पाहायला मिळत आहे. इंडिगो विमानाचे बुकींग असलेल्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसला आहे. याबाबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. इंडिगोच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार असल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. या प्रकरणाची केंद्र सरकारकडून गंभीर दखल घेतली आहे.

इंडिगोच्या सेवेत झालेलेल्या अडचणींमुळे प्रवाशांना झालेल्या गैरसोयीची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे. ऊ्रछ च्या ऋऊढङ आदेशांना तत्काळ स्थगिती देण्यात आली असून, प्रवासी हित लक्षात घेऊन आणि विमान सुरक्षेत कोणतीही तडजोड न करता हे निर्णय घेण्यात आले आहेत. मंत्रालयात २४÷७ नियंत्रण कक्ष उभारण्यात आला असून तेथून परिस्थितीवर देखरेख ठेवली जात आहे. केंद्र सरकारने या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार ही परिस्थिती पूर्णपणे सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर कार्यरत आहे. आम्हाला विश्वास आहे की पुढील एक-दोन दिवसांत विमानसेवा स्थिर होतील आणि तीन दिवसांत पूर्णपणे सामान्य होतील असे मोहोळ म्हणाले.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व विमान उड्डाणांचे वेळापत्रक स्थिर होईल आणि आज मध्यरात्री सामान्य स्थिती येईल. पुढील काही दिवसांत संपूर्ण सेवा आणि स्थिरता येईल.इंडिगो आणि इतरांनी स्थापित केलेल्या माहिती प्रणालीद्वारे प्रवासी घरी बसून विलंबाचा माहिती घेऊ शकतात. उड्डाण रद्द झाल्यास इंडिगो तिकिटांसाठी स्वयंचलितपणे पूर्ण परतफेड सुनिश्चित करेल. प्रवासी अडकले असल्यास त्यांना विमान कंपन्यांनी निवास व्यवस्था बुक केलेल्या हॉटेलमध्ये ठेवण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यांना आरामखुर्ची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. उशिर झालेल्या उड्डाणांच्या प्रवाशांना अल्पोपहार आणि इतर आवश्यक गोष्टी पुरवल्या जातील. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचा २४/७ नियंत्रण कक्ष सतत परिस्थितीवर प्रत्यक्ष वेळेवर लक्ष ठेवून आहे.

पान मसाला खाणाऱ्या, सिगारेट ओढणाऱ्यांना मोदी सरकारचा दणका; लोकसभेत महत्त्वाचं विधेयक मंजूर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली: संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत आरोग्य सुरक्षेतून राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक मंजूर झालं आहे. या विधेयकाचं कायद्यात रुपांतर झाल्यावर सिगारेट , पान मसाला सारख्या उत्पादनांवर सरकार अतिरिक्त कर लावेल. सरकारच्या तिजोरीत जमा होणारा अतिरिक्त पैसा राष्ट्रीय सुरक्षेसाठी वापरण्यात येईल, असं सरकारकडून सांगण्यात आलं आहे. अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी ही माहिती शुक्रवारी लोकसभेत दिली.

विधेयक मंजूर झाल्यानं पान मसाला सारख्या वस्तू महाग होतील. या विधेयकावर संसदेत बराच वेळ चर्चा झाली. दोन दिवस चर्चा झाल्यानंतर विधेयक लोकसभेत मंजूर झालं. यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विधेयकावर भाष्य केलं. 'कारगिलमधील युद्ध तयारी कमी असल्यानं झालं. लष्कराकडे केवळ ७० ते ८० टक्के हत्यारं, दारुगोळा आणि शस्त्र असल्याचं लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला सांगितलं होतं. तशी परिस्थिती पुन्हा निर्माण व्हावी, असं आम्हाला वाटत नाही,' असं सीतारामन म्हणाल्या.



या विधेयकामुळे नागरी आरोग्याच्या सुविधा मजबूत करण्याचा मार्ग अधिक प्रशस्त झाल्याचं अर्थमंत्री सीतारामन यांनी म्हटलं. 'लोकांच्या आरोग्याशी संबंधित धोके कमी करण्याचा आमचा हेतू आहे. हा उपकर राष्ट्रीय सुरक्षेच्या आघाडीवर सहाय्यक ठरेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी अनेक विषयांवरील सरकारची भूमिका स्पष्ट केली. 'आज जगात हायटेक युद्धाचा काळ आहे. अत्याधुनिक हत्यारं अतिशय महाग आहेत. सायबर ऑपरेशनसाठी बराच पैसा लागतो. कारगिलमध्ये भारताचं नुकसान झालं. कारण लष्कराकडे अपुरा निधी होता. तेव्हा ७० ते ८० टक्के हत्यारं आपल्याकडे होती. दारुगोळा मर्यादित होता. त्याची पुनरावृत्ती होऊ नये,' असं अर्थमंत्री म्हणाल्या.

सिगारेट, पान मसाला सारख्या उत्पादनांवर लावण्यात येणारा उपकर पूर्णपणे संसदेच्या अधिकारात येतो. अवगुणांशी संबंधित वस्तू स्वस्त नसतील, ही बाब अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केली. 'महसूल गोळा करणं गरजेचं आहे. देशाची सुरक्षा आणि लोकांचं आरोग्य दोन्ही मजबूत राहायला हवं. कोणत्याही जीवनावश्यक वस्तूवर उपकर लावण्यात आलेला नाही. तर आरोग्यासाठी घातक उत्पादनांवर लादलेला आहे,' असं अर्थमंत्री म्हणाल्या.

टीईटी सक्तीविरोधात गुरुजी एकवटले, पण पदवीधर, शिक्षक आमदारकीचा वास लागला!

कोल्हापूर : २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटीची अट रद्द करावी. गट मान्यतेसाठीचा जीआर रद्द करावा आणि जुने मानके लागू करावीत. ऑनलाइन आणि शैक्षणिकेतर कामांचा भार शिक्षकांवर टाकणे थांबवावे. शिक्षण सेवक योजना रद्द करावी आणि नियमित वेतन श्रेणी निश्चित करावी. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा त्वरित भराव्यात. सुधारित खात्रीशीर प्रगती योजना लागू करावी, आदी मागण्यासाठी राज्यातील हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले. कोल्हापूर जिल्ह्यातही दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी हजारो शिक्षकांनी मोर्चात सहभाग नोंदवला. दसरा चौकातून मोर्चाला प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा पोहोचल्यानंतर गेटवर पोलिस आणि शिक्षकांची चांगलीच धक्काबुकी झाली.

सौर ऊर्जेच्या वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र थांबणार नाही; सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ

मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विक्रम; गिनीज बुकात नोंद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर, दि.५(जिमाका)- देशात महाराष्ट्र हे सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावाट वीज निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे आश्वसन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलतांना केले.

एका महिन्यात ४५ हजार ९११ कृषी पंप

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅबेले हे ही यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे इमाव बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे,राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषद सदस्य आ. संजय केणेकर, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे,आ. प्रशांत बंब,आ. सुरेश धस, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

पंच कार्ल सॅबेले यांनी केली विक्रमाची घोषणा

सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करुन त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दुरदूष्य प्रणालीने संवाद साधला. त्यानंतर गिनीज बुक विक्रम नोंदचे निरीक्षक पंच कार्ल सॅबेले यांनी विक्रमाची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र व मेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या खखच् बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

कार्ल सॅबेले म्हणाले की, विक्रमासाठी ३५ हजार पंप स्थापित करणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात ४५ हजार ९११ पंप स्थापित करण्यात आले, हा एक विश्वविक्रम आहे. या प्रत्येक पंपाच्या उभारणी ते कार्यान्वयन या सर्वटप्प्यांवर पडताळणी करुनच या विक्रमास मान्यता देण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. हे जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

श्री. फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी चांगली होती की, आपल्या राज्यातील ही योजना ही अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार 'कुसूम' ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ करुन आपण प्रतिक्षा कालावधीत कमी केला. महावितरणचे कर्मचारी अधिकारी. सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

सौर ऊर्जेद्वारे १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता

श्री. फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदुषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, असेही त्यांनी यावेळी घोषीत केले.

ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा

श्री. फडणवीस यांनी पुढे सांगितले की, सौर ऊर्जेचा वापर वाढल्यामुळे सौर ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्या, वेंडर्स, कामगार, देखभाल करणारे अशा १ लाख लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा देणारी ही योजना आहे,असे त्यांनी सांगितले.

मराठवाड्याचा वाटा मोठा

मराठवाड्याचे कौतुक करतांना श्री. फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप लावण्यात आले. शेतकऱ्यांना नानासाहेब देशमुख कृषी संजिवनी योजनेमार्फत अन्य लाभ, बाजाराची उपलब्धता देऊन शेती शाश्वत कशी होईल, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नदी जोड सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहून जाणारे पूराचे पाणी मराठवाड्यात , विदर्भात व उत्तर महाराष्ट्रात नेऊन दुष्काळ मुक्ती करायची आहे. यासर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध आणि शाश्वत होईल. आमचे सरकार हे शेतकऱ्यांप्रती समर्पित सरकार असून शेती शाश्वत होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहू, असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व मंत्री अतुल सावे यांनीही यावेळी उपस्थितांशी संवाद साधून सौर कृषी पंप योजनेमुळे शेती क्षेत्रात आणि अर्थकारणात मोठे बदल होतील,असा विश्वास व्यक्त केला. या ठिकाणी लावलेल्या सौर ऊर्जा उत्पादनांच्या प्रदर्शनालाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली व पाहणी केली.

प्रास्ताविक लोकेश चंद्रा यांनी केले. तर निता पानसरे यांनी आभार मानले. नीता पानसरे, आश्विनी दाशरथे, प्रेषित रुद्रावतार यांनी सूत्रसंचालन केले.

संपादकीय....

अनिश्चिततेला पूर्णविराम

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांवर अखेर सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेत स्पष्ट आदेश दिले आहेत. राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने सांगितले. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश देत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेवरील अनिश्चिततेला पूर्णविराम दिला. २ डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. उच्च न्यायालयांमधील विविध याचिकांचा, प्रकरणांचा किंवा खंडपीठांच्या आदेशांचा परिणाम होऊन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. नागपूर, औरंगाबाद खंडपीठ किंवा मुंबई उच्च न्यायालय असेल, त्यांच्या कोणत्याही आदेशाचा परिणाम निवडणुका लांबण्यावर होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले. या मुदतीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत पुढे ढकलता कामा नयेत. नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ तारखेपूर्वी करण्यास नकार दिला आहे. २ तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी कोणत्याही परिस्थितीत २१ च्या पुढे ढकलली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने २१ तारखेला होणारी मतमोजणी लवकर घ्यावी अशा स्वरूपाचे आदेश दिलेले नाहीत. गेल्या काही वर्षांपासून अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध कारणांमुळे पुढे ढकलल्या जात होत्या. यामुळे नागरिकांमध्ये तसेच जनप्रतिनिधींमध्येही प्रचंड अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला होता.

६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त विशेष लेख

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन, या दिवशी देश विदेशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात येते.महाराष्ट्रातही मुंबई येथील चैत्य भूमीवर देशभरातुन आंबेडकर अनुयायी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी एकत्र येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आंतराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ञ, जलतज्ञ, विचारवंत, अभ्यासक तथा लेखक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच भारताला विस्तृत आणि लिखित स्वरूपाचे संविधान मिळाले आज त्याच संविधानामुळे भारतातील प्रत्येक नागरिकांना समानतेचे, स्वातंत्र्याचे, न्यायाचे अधिकार मिळाले. भारतीय संविधाना मुळेच आज प्रत्येक नागरिकाला कलम १९ अंतर्गत भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य,संचार स्वातंत्र्य, संघटना व सहकारी संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, निशस्त्र एकत्र येण्याचे आणि सभा घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले. भारतीय संविधानामुळेच प्रत्येक भारतीय नागरिकांना मतदानाचा, निवडणूका लढविण्याचा अधिकार, पत्रकारितेचा,वृत्तपत्र छापण्याचा, संसदेतील भाषण टीव्ही चॅनलवर दाखवण्याचा अधिकार मिळालेला आहे.

भारतीय संविधान कलम २१ अंतर्गत ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार मिळाला.कलम २३ अंतर्गत महिलांच्या विक्रीस तसेच वेठीबिगारी सारख्या जुलमी प्रथेस निर्बंध लावले. कलम २४ अंतर्गत धोक्याच्या ठिकाणी बालकांना कामावरती ठेवण्यास निर्बंध लावले. भारतीय महिलांना मतदानाचा अधिकार तसेच निवडणुका लढवण्याचा,प्रसूतीच्या दरम्यान सहा महिने पगारी सुट्टीचे अधिकार बाबासाहेबांमुळे मिळाले.एकंदरीत समाजातील सर्वच घटकांना न्याय देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे.सर्वच घटकांसाठी बाबासाहेबांनी काम केलेले असले तरी आज जाणीवपूर्वक बाबासाहेबांना केवळ दलितांचे नेते या पुरतच सीमित ठेवण्याच काम विरोधकांकडून होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगारांसाठी सुद्धा योगदान दिलेले आहे. परंतु ती गोष्ट आजच्या शेतकऱ्यांना माहिती होऊ दिली नाही.

२० व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच शेतकऱ्यांचे खरे नेते होते ही गोष्ट शेतकऱ्यांना माहिती होऊ दिली नाही. खरंतर भारताच्या शेती प्रश्नावर मूलभूत स्वरूपाचे भाष्य करणारे स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमेडीज या नावाचे पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले होते.२० व्या शतकात शेतकऱ्यांवर पुस्तक लिहून त्यांच्या समस्या मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव अर्थतज्ञ, राजनीती तज्ञ होते ही गोष्ट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू दिली नाही.

सरकारचे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीच्या उत्पन्नाचा विचार न करताच सरकार

कडून वसुल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यास विरोध दर्शवला होता. डॉ. आंबेडकरांनी विधीमंडळातील अर्थसंकल्पा वरील भाषण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केले होते. तसेच त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांवर खोतीपद्धती द्वारे होणाऱ्या अन्यायाला देखील वाचा फोडली होती.

कोकणातील खोतांनी शेती असणाऱ्या कुळांना जेरीस आणले होते.खोती पद्धतीमध्ये सर्व जमीन खोतांच्या ताब्यात होती. खोती पद्धतीला ब्रिटिश सरकाराचे संरक्षण ही होते. ब्रिटिशसत्ता काळात खोत हा सरकारचा अधिकारी असे. शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करून तो सरकारला देणे हे खोतांचे काम असे. शेतकऱ्यांकडून जबरदस्ती सारा वसुल करणे,त्यांच्या वरती कर्जाच ओझं टाकून स्वतः च्या जमिनी मध्ये शेतकऱ्यांकडून मोफत काम करून घेणे. अश्या पद्धतीचा अन्याय शेतकऱ्यांवरती होत होता.

शेतकऱ्यांवरील हा अन्याय थांबावा खोती पद्धत नष्ट व्हावी या साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहिले. कोकणात खोती पद्धतीविरोधात चळवळ उभा केली. १९३४ मध्ये कोकण प्रांत शेतकरी परिषदेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते.याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली या पक्षाच्या धोरणामध्ये ही बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या अनुषंगाने महत्व पूर्ण बाबींवर भर दिला.

मुंबई प्रांताच्या विधिमंडळात सदस्य असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबईच्या विधीमंडळात खोती पद्धत रद्द करण्याचे विधेयक मांडले. खोतांच्या संघटनेकडून या विधेयकाला कडाडून विरोध झाला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर डगमगले नाहीत.

१० जानेवारी १९३८ रोजी मुंबई कौन्सीलच्या असेम्बलीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जवळपास २५ हजार शेतकऱ्यांना सोबत घेऊन भव्य मोर्चा काढला, सरकाराचे लक्ष पुन्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे वळवले आणि सरकार पुढे बाबासाहेबांनी काही मागण्या केल्या, त्या मध्ये पहिली मागणी अशी होती.

जमिनीची मशागत करणाऱ्यालाच मेहनतीचे फळ मिळावे.

खोत आणि इनामदार या सारखे सरकारने मध्यस्थी ठेवू नये.

शेतकऱ्यांवर कर लावण्यापूर्वी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना किमान मजुरी देण्याची कायद्याने सोय करावी.

थकीत शेतसारा माफ करावा.

खोती – इनामदारी पद्धती जुलमी असल्याने ती कायद्याने रद्द व्हावी. या पद्धतीच्या शेतकऱ्यांच्या हिताच्या मागण्या करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरे शेतकरी नेते होते हे आपल्या लक्षात येते.

पुढे बाबासाहेब आंबेडकर असं म्हणतात की शेती समृद्ध झाली तरच शेतकरी शेतमजूर आणि संपूर्ण देश समृद्ध होईल.

खोती पद्धतीच्या विरोधात जवळ पास ७ वर्ष लढा सुरु होता. खोती विरोधात वाढता रोष पाहून शेवटी १९५० मध्ये खोती विरोधी विधेयक पास झाले आणि खोती पद्धत नष्ट करण्यात आली. या मुळे कोकणातील जवळपास १ लाख २३ हजार एक्कर जमीन खोतांच्या तावडीतून सुटली आणि ती शेतकऱ्यांना मिळाली. या मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात मोठे योगदान होते ही गोष्ट आजच्या शेतकऱ्यांना माहिती झाली पाहिजे.

केवळ कोकणातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांना सरकारने पाण्याची व्यवस्था करावी, उत्पादित मालाला योग्य भाव द्यावा इत्यादी बाबींकडे सुद्धा सरकारचे लक्ष वळवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते ही गोष्ट प्रत्येक शेतकऱ्याने लक्षात घेतली पाहिजे.अश्या या बहुआयामी आणि समाजहीत दक्ष महामानवास महापरीनिर्वाण दिनी विनम्र अभिवादन.

साभार – परमेश्वर बनकर, व्याख्याते व लेखक बीड. ९५०३२८८२८२



फुले आंबेडकर शोषितांचे क्रांति तत्त्वज्ञान ग्रंथाचे प्रकाशन करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन....!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

आज सहा डिसेंबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन. डॉ बाबासाहेबांचे दिल्ली येथे निधन झाले. निधनानंतर मुंबईतील चैत्यभूमी येथे त्यांचा अंत्यविधी संपन्न झाला. त्या क्षणापासून चैत्यभूमीला प्रेरणास्थान मानले जाते. निधना पूर्वीच्या दोन महिने आधी डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. लाखोच्या संख्येनी अनुयायी बौद्ध झाले. तेव्हापासून चैत्यभूमी अनेक अनुयायांचा देशभरांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येतात. यादिवशी देश-विदेशातील आंबेडकरी जनता बौद्ध विहारे, घराघरातून, शाळा, महाविद्यालय सार्वजनिक ठिकाणी, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधानसभा, राष्ट्रपतींचे कार्यालय, इत्यादी ठिकाणी त्यांना वंदन करून कृतज्ञता व्यक्त केली जाते.

६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. ते ६५ वर्षाचे होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विसाव्या शतकातील एक सामाजिक क्रांतीचा आंदोलन होतं. नव्हे तर त्या आंदोलनाचे नावच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर होतं. हयात भर सावता स्वातंत्र्य बंधुता न्याय या मानवालाआवश्यक असणा-या जीवन मूल्यासाठी त्यांनी आपलं आयुष्य खर्ची केलं. डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक नव्या क्रांती जाणीव त्यांनी निर्माण केल्या. अनेक पिढ्या घडवल्या. वैचारिक क्रांती केली. त्यांच्या जीवनातील मनुस्मृती दहन, चवदार तळ्याचा सत्याग्रह, पर्वतीच्या मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह, काळाराम मंदिराचा सत्याग्रह, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेची भूमिका, धर्मांतर करण्याची भूमिका, तसेच सायमन कमिशनला दलितांच्या हक्क संरक्षणासाठी दिलेली निवेदने सत्याग्रह, या सर्व घटनां व प्रसंगातून बाबासाहेब अतिशय रचनात्मक, रक्ताचा बिंदू ही न साडंता, लोकशाही पद्धतीने केलेली आंदोलने व सत्याग्रह केलेली आढळून येतात.

डॉक्टर बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले असे आपण म्हणतो. तेव्हा 'महापरिनिर्वाण' हा शब्द बौद्ध संस्कृतीत रुढ आहे. याचा अर्थ असा आहे की मृत्यूनंतरचे निर्वाण प्राप्तीनंतर संसार आणि जीवन यातून मुक्त असा होतो. पुन्हा जन्म होत नाही. विशेष म्हणजे बौध्द मताप्रमाणे निर्वाण म्हणजे दुःखापासून मुक्तता. दुःखाचे मूळ कारण तृष्णा म्हणजे लोभ व वासना होय. माणसाने आपल्या वासनेवर विजय मिळवला तर त्याला दुःखापासून स्वतःची मुक्तता करून घेता येते. चेतना नाहीशी होते. चलन वलन थांबते. याला महान परिनिर्वाण म्हणतात. तत्व आणि ध्येय याला परिनिर्वाण म्हणतात. निर्वाण म्हणजे मुक्ती असा होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतिय घटनेचे शिल्पकारच नव्हे तर एक इतिहासतज्ज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, अर्थतजज्ञ, समाजशास्त्रज्ञ, घटनातज्ज्ञ, अनेक भाषेवर प्रभावी वक्तृत्व असलेला प्रभावी वक्ता, निर्भिड मनाचा समाज मार्गदर्शक, संशोधक, व ग्रंथकार म्हणून प्रसिध्द होते.

विसाव्या शतकातील अलौकिक व्यक्तिमत्व. अनेक पदव्या, सुमारे ६५ विषयाचा अभ्यास केला होता. एकून नऊ भाषा त्याना अवगत होत्या. त्यापैकी मराठी, हिन्दी, संस्कृत, गुजराती, इंग्रजी, पारशी, जर्मन, फ्रेंच आणि पाली ह्या होत.

डॉ बाबासाहेबांनी २१ ग्रंथ, १७५ लेख, २०० मुलाखती, ३५१ भाषणे, ६०० निवेदने, पत्रके, व पत्राचार असा एकून २३ खंडामध्ये त्यांचे साहित्य प्रकाशित झालेले आहे. इंटरनेवर असंख्य वेबसाईट अपलोड आहेत. सुमारे १२५ पेक्षा जास्त अभ्यासकांनी बाबासाहेबांच चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. (डॉ) राजाभाऊ भैलुमे यांनी चरित्रांवर पी.एचडी.चा अभ्यास केला आहे. संकलन व संपादन केलं आहे.

अलिकडच्या काळात अनेकांनी बाबासाहेबांवर इंग्रजीतून चरित्र लिहिली आहेत त्यापैकी अशोक गोपाल यांनी लिहिलेले 'Part part : The Life and Thought of B. R. Ambedkar' चरित्र सध्या चर्चेत आहे.

धनजय कीर यांच 'डॉ. आंबेडकर : लाईफ अँड मिशन' चरित्र गाजले. सन २०१८ ला चौथ्या आवृत्तीचे अकरावे पुनर्मुद्रण झाले.

विशेष म्हणजे, दिनांक २० जुलै १९४२ ला नागपूर येथे All India Schedule Caste Federation या समारोपिय भाषणात पंचसुत्री सांगितली.

-शिक्षित व्हा.
-चळवळ करा.
-संघटित व्हा.
-आत्मविश्वास बाळगा.
-कधीही धीर सोडू नका

ही पंचसुत्री वंचितांच्या भवितव्याचा जाहिरनामा होय. बाबाहेबांच संपूर्ण आयुष्य समता, स्वातंत्र्य, बधुता आणि न्याय या तत्वासाठी घालविली आहे.

महामानवास कोटी कोटी विनम्र वंदन...!!!

संपर्क : डॉ. दत्तात्रय गायकवाड
मोबाईल : ९८६०५९१३०५

आदर्शांना अपेक्षित प्रबुद्ध समाज निर्माण करणे हीच खरी आदरांजली होय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मित्रहो,

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन, आदरांजली अर्पण करायचे असेल तर नेमकेपणाने काय केले पाहिजे? याचा आपण विचार केला पाहिजे. छायाचित्रे, मूर्ती आणि पुतळ्यासमोर नतमस्तक होत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तात्विक विचारांचे आपल्या जीवनात आचरण करून त्यांनी अपेक्षीलेला आदर्श समाज निर्माण करण्यासाठी आपण आपल्या प्राणाची बाजी लावली पाहिजे.

९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉल मध्ये केंद्रीय संस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने समाजसेवकांची बैठक बोलावण्यात आली होती. ज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश अर्थात शिकवा, चेतवा आणि संघटित करा म्हणजे सुशिक्षित करा आणि त्यांच्या हीन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा जेणेकरून त्यांना संघटित करता येईल. ही त्रिसूत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारीणी सभेचे ब्रीदवाक्य राहिलेले आहे. परंतु या त्रिसूत्री चे मर्म आजतगायत आपण समजून घेऊ शकलो नाही परिणामी संघटित होण्यासाठी सुद्धा संघर्ष करावा लागतो, याची आम्हाला जाणीवच झाली नाही. म्हणून आम्ही संघटित न होताच संघर्ष करीत आहोत. ज्याचा दबाव व्यवस्थेवर निर्माण होत नाही. तरीही सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा या त्रिसुत्रीचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा अनुयायी, हितचिंतक प्रचार प्रसार करीत असल्याने समाजात शिक्षित, उच्चशिक्षित, अतिउच्च शिक्षित व्यक्ती निर्माण झाल्यात परंतु त्या सुशिक्षित होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्या स्वयं केंद्रित झाल्यात, परिणामी आपल्या कुटुंबापुरत्या मर्यादित झाल्यात. ज्यामुळे उर्वरित अविकसित समाजाशी त्यांचे नातेसंबंध उरले नाहीत. म्हणून समाजात विकसित आणि अविकसित असे सरळ सरळ दोन गट निर्माण झालेत. त्यामुळे केवळ अविकसित समाजच नेतृत्वहीन झाला असे नाही तर नेतृत्वहीन समाजाला नेतृत्व प्रदान करण्याचा वसा घेतलेले सुद्धा नेतृत्वहीन झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्याचे परिणाम आपल्या सर्वांसमोर उपलब्ध आहेत. अस्पृश्याची समस्या म्हणजे प्रचंड हिमालय आहे. असे नमूद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, या हिमालयाशी टकरा मारून मी माझे डोके फोडून घेणार आहे. ज्यामुळे हिमालय कोसळला नाही तरी मात्र माझे रक्तबंबाळ डोके पाहून सात कोटी अस्पृश्य लोक हिमालय जमीनदोस्त करतील. या अपेक्षेला आम्ही पात्र ठरलो आहोत काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे. म्हणून ४ जून १९२७ ला चिराबाजार, मुंबई येथे दिलेल्या संदेशाप्रमाणे आपला उद्धार करायला आपणच कंबर कसली पाहिजे. तसेच स्वावलंबन आणि स्वाभिमान बाळगून आपण आपले कार्य नेटाने चालविले पाहिजे.

१८ व १९ जुलै १९४२ ला नागपूर येथे अखिल भारतीय दलित वर्ग परिषद संपन्न झाली, ज्यात अस्पृश्य लोक हिंदूचा एक विभाग अथवा उपविभाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवनातील तो एक स्वतंत्र आणि ठळक असा घटक आहे, हा सिद्धांत माझ्या राजकारणाचा पाया आहे. तसेच लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच लाभतील, पण लोकशाही मेली तर विनाश अटळ आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. तर मग वर्तमानात आपल्या देशात लोकशाहीची नेमकी स्थिती काय आहे? २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लॉ लायब्ररीमध्ये संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी पाळावयाच्या पूर्वावर्ती शर्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केलेल्या आहेत. त्याचे अनुपालन होत आहे काय? याची चिकित्सा करून त्याप्रमाणे अनुसरण करणे हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली ठरू शकेल.

२० जुलै १९४२ ला नागपूर येथे अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कार्याबद्दल आयोजकाकडून मानपत्र प्रदान करण्यात आले होते. त्याप्रसंगी ऐतिहासिक संदेश देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की सुशिक्षित

व्हा, चळवळ करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका. ही आमच्या जीवनाची पंचसूत्री होय. अर्थात ९ मार्च १९२४ ला दिलेल्या त्रिशूत्रीचा पंचसूत्री मध्ये अशाप्रकारे विस्तार केलेला आहे. या परिषदेसोबत अखिल भारतीय महिला परिषद व समता सैनिक दल परिषद सुद्धा घेण्यात आली होती. त्यात स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. असे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते. त्या परिषदेला ५० हजार पुरुष, २० हजार महिला व ५ हजार समता सैनिक दल दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते. तर मग चळवळीत महिलांची आजची स्थिती काय आहे? याची जाणीव ठेवून आम्ही समाज जीवनात कार्यरत आहोत काय? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या चळवळीचे लाभार्थी, हितचिंतक थोडेफार दिवस काम करून, कंटाळून विविध कारणास्तव चळवळीचे कार्य सोडून देतात आणि लई काम केल्याचा आव आणत असतात? जसे काही त्यांनी आपले आदर्श महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकरापेक्षा जास्तच कार्य केलेले आहे? याची शहानिशा मात्र आता आपणच केली पाहिजे? तरच आपणाला आदरांजली अर्पण करण्याचे कर्तव्य पार पाडता येईल.

बुलढाणा जिल्ह्यातील पातुर्डा मुक्कामी २९ मे १९२९ ला संपन्न झालेल्या वऱ्हाडप्रांतीय अस्पृश्य परिषदेत तेथील अस्पृश्य बांधवांनी स्पृश्य समाजाला धर्मांतराची नोटीस दिली होती. या परिषदेत, या ठरावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली होती. याची जाणीव ठेवून १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला येथील परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही. अशी मर्मभेदी भीम गर्जना केली होती. ज्यामुळे हिंदू धर्मातील अस्पृश्य गणलेल्या वर्गाने हिंदू धर्माचा त्याग करून ज्या धर्मात समानतेचे हक्क मिळतील त्या धर्मात प्रवेश करावा असा ठराव पास करण्यात आला होता. या मर्मभेदी गर्जनेवर दीर्घकाळ विचारमंथन करून १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या नाग भूमीत दीक्षाभूमीवर आपल्या लाखो अनुयायासह बुद्ध धम्माचा अंगीकार केला. ही ऐतिहासिक वास्तविकता आपल्यासमोर असली तरी आपण आचरणाने बुद्ध झालो काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे. तरी या प्रश्नाची सोडवणूक करताना शुद्ध आचरणाने बुद्ध होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली अर्पण केली पाहिजे.

चळवळीचा असा जाजवल्य ऐतिहासिक इतिहास उपलब्ध असताना वर्तमानात मात्र चळवळीची वाताहात होत असल्याचे पाहायला मिळत आहे. महाड सत्याग्रहात संदेश देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, एखाद्या रोगाची रोग परीक्षा नीट केली नाही तर त्यावर केल्या जाणाऱ्या उपाय योजना निष्फळ ठरतील आणि त्या रोगाचा कालावधी वाढत जाईल. करिता या सर्व समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील पक्ष, संघटना व संस्थेत प्रशिक्षित कार्यकर्ते असणे आवश्यक आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकारणात यशस्वी होण्यासाठी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टु पॉलिटिक्स चालविले पाहिजे. आता मात्र केवळ राजकारणाचा विचार करून चालणार नाही तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध होण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा सर्व पक्ष, संघटना व संस्थानी चालविल्या पाहिजेत. अशा प्रकारची कृतीशीलता अनुसरण करून आदर्शांना अपेक्षित प्रबुद्ध समाज निर्माण करणे हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल. करिता मी माझ्याकडून, परिवाराकडून, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन च्या वतीने आदरांजली व्यक्त करून हा शब्द प्रपंच येथे थांबवतो.

विनम्र,
आदरांजली! आदरांजली!! आदरांजली!!!

लेखक : बी. बी. मेश्राम,
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन,
दि नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना).
संपर्क : ९४२१६७८६२८, ८९८३०८२१२८.
circumference1968@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण आणि वर्तमानातील धग

डॉ. कोंडबा भगवान हाटकर
एम.ए., मराठी, एम.फिल., नेट, सेट,
पीएच.डी. पोस्ट डॉक्टरेट फेलो
मो. नं. ९५५२१३३९५१ औरंगाबाद.

गुरूवार, सहा डिसेंबर एकोणीशे छपन्न अलीपूर रोड दिल्ली येथे प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक चिरंतन प्रवास थांबला! सुर्यास्त झाला, प्रभा निवळली आणि अंधाराचे ढग जमायला सुरवात झाली. एका दबलेल्या क्लास (डिप्रेस क्लास) पिचलेल्या अस्पृश्य समजाचा मार्गदर्शक नेता तथा अखंड भारताच्या निर्मितीसाठी या देशाची संहिता लिहिणारा अर्थात राज्यघटनेचा निर्माता राष्ट्रपिता गांधीजीचा जीवनदाता चिरनिद्रा धारण करून 'निर्वाण' पदाला प्राप्त झाला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची थोरवी किती वर्णावी ? अस्पृश्य समाजाचे उत्थान, स्त्री उध्दार आणि भारत देशाच्या निर्माणासाठीचे कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. बाबासाहेबांनी इतक्या कमी आयुर्मानाम ध्ये प्रचंड मोठे आणि तितकेच व्यामिश्र स्वरूपाचे, अभ्यासांती कार्य केले आहे. कुशाग्र बुध्दिमत्तेचा हा माणूस जीवनभर सातत्यपूर्ण प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहिला. कोट्यावधी जनमाणसांच्या जीवनात प्राण फुंकून गेला, त्यांच्या जीवनाचं सोनं करून गेला. बाबासाहेबांनी केलेलं रचनात्मक कार्य खरचं अद्वितीय स्वरूपाच आहे. अनन्य साधारण असे आहे. संबंध जगामध्ये आधुनिक काळात बाबासाहेबांसारखा 'प्रज्ञापुरूष' शोधून सापडणार नाही. त्यांच्या कार्याला अभ्यासाला आणि त्यांच्या प्रामाणिक निष्ठेला जगात तोड नाही. तत्व, विचार आणि निष्ठेशी बाबासाहेबांनी कधीच तडजोड केली नाही. अस्पृश्य समाजाच्या एकूण उत्थानासाठी, उत्कर्षासाठी हा माणूस रात्रंदिवस झिजत राहिला. वेळप्रसंगी अनेकदा संसाराकडे दूर्लक्ष झाले. स्वतःची चार मुलं गमवावी लागली.

सुस्वरूप व तितकीच गुणवान असलेली पत्नी माता रमाई, बाबासाहेबांची प्राणप्रिय लाडकी रामू ! त्यांना अर्ध्यावर सोडून गेली ती रमाई बाबासाहेब नावाच्या हिमालयाची सावली होती. भीमरावांना 'बाबासाहेब' बनविणारी ध्येयवादी, जिद्दीने पेटलेली काटेरी वाट तुडवत जाणारी ती बाबासाहेबांची रामू ! त्या माता रमाईला 'क्षय' नावाचा रोग झाला. रमाई गेली रमाईला डोळ्यात अश्रू अनावर झालेले असतांना त्यांचे साहेब म्हणतात तुझी प्रकृती सुधारावी म्हणून लंडनला नाही घेऊन जावू शकलो ते माझ्या मनात होत. ते तसच राहिलं. हा महापुरूष आपल्या पूर्णांगीला मोसंबीचा रस चमच्याने पाजू लागला. असं हृदयाला पीळ पाडणारं वर्णन चां. भ. खैरमोडे यांनी लिहिलयं किती, दुःख आणि यातनाचा प्रवास केलाय बाबासाहेबांनी कधीही पुन्हा न परतण्याच्या मार्गाने मुलं गेली. श्रेष्ठतम पत्नी गेली. हा संवेदनशील माणूस हाळहाळला नसेल का? हा 'बाबासाहेब' नावाचा ज्ञानसागर अविरत खळखळाळत राहिला तो समाजसाठी, अस्पृश्य दीनवाण्या, पीडित युगानी युगे तोंड असून मुक्या-बहिऱ्या झालेल्या जनतेचा माय-बाप झाला. मुक्याची वाचा झाला. मूकनायकांचा नायक झाला त्या बाबासाहेबांशी कृतज्ञ असलेला समाज, जनता आजही म्हणते, बाबासाहेब चंदनासारखे आमच्यासाठी झिजले. अंगावरच्याकातड्याची बुटं (जोडा) करून त्यांच्या पायात घातला तरीही त्यांचे ऊपकार फिटणार नाहीत. केवढा हा कृतज्ञ भाव आहे ! बाबासाहेबांच्या विचारांसाठी त्या नावासाठी प्राणार्पण करणारा समाज, अनुयायी आजही आहे. एक प्रचंड मोठी उर्जा म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर !

बाबासाहेब आंबेडकर निर्वाणस्थ झाले आणि समाजाला धुंदी आली. समाज भांबावला. त्यामध्ये प्रस्थापितांचे फावले. आपल्यातले अनेक गळाला लागले. काहीनी अवकाश ओळखून संधी साधली. स्वार्थाने बरबटलेले नेते, कार्यकर्ते तयार झाले असे आपल्यातील लोक फक्त मोठेपणासाठी मिरवू लागले. बाबासाहेबांच ब्रेन्डेड नाव घेऊन चिक्कार बोंबलू लागले. फक्त नावाचा जयजयकार करू लागले.

बाबा, तुम्ही म्हणाले होते, माझ्या नावाचा जयजयकार करू नका तर माझ्या दृष्टीने मोलाचे जे कार्य उर्वरित बाकी आहे ते करण्यासाठी झटा. जागृतीचा अग्नी विझू देऊ नका. स्वाभिमान हा भाकरीपेक्षा महत्त्वाचा आहे. असे कितीतरी मौलिक संदेश तुम्ही पोटतिडकीने दिले. हीनता, गुलामी आणि लाचारी माझ्या समाजाने, अनुयायांनी कधीही पत्करू नये म्हणून तुम्ही 'खापऱ्या महाराची' गोष्ट सांगायचे ती. गोष्ट मी थोडक्यात सांगतो. खापऱ्या' महार हा आडदांड पण फुकटच्या मोठेपणासाठी हापापलेला गावकीचे काम इतरांनी सोडले तर हा स्वीकारणारा एकदा गावच्या पाटलाकडे पाहुणे आले. वाड्यात ओट्यावर बैठक सुरू झाली. दिमतीला काही चार पाच महारांना पाटलांनी बोलावले त्यात खापऱ्या महारही होता. ते ओट्याच्या खाली अंगचोरून गुलामासारखे थांबलेले पाटलाची बायको पाहुण्यांच्यासाठी वाड्यात स्वयंपाकात गुंतलेली एवढ्यात ओट्यावर पाटलाच्या लहान मुलाने खेळत असताना 'शी' केली तेही दोन तीन ठिकाणी भरपूर ! पाटीलाची पंचायत झाली. 'शी' भरून पाटील कशी काढणार ? घाण वास येऊ लागला. माशा घोंगावू लागल्या. पाटील महारांना खुणेनी खुणवायचा पण ते न पाहिल्यासारखे करायचे. पाटीलांनी शिवी हासडली, 'भडव्या खापऱ्या तुला दिसत नाही का? ही मुलानी घाण केलेली.' खापऱ्या महार उठला त्याने तळहाताने 'शी' धाण साफ केली. मातीने हात पुसले. नंतर पाटलानी 'खापऱ्या' ला पापड, लोणचे आणि मोरवाभर ताक दिले. 'खापऱ्या' मांग महाराच्या लोकांमध्ये जाऊन सांगू लागला. 'माझा किती वट (शान) आहे. पाटलानी माझे नाव पुकारले. (संदर्भ आर. डी. गायकवाड, आंबेडकरी चळवळीच्या आठवणी)

आजही अशी 'खापऱ्या' महारांची संख्या गणितीय पध्दतीने वाढली आहे. आता ही गोष्ट सांगण्याला बाबासाहेब

नाहीत. पण शहाण्यांना शब्दाचा मार असतो असे म्हणतात. घाणीतून आपणाला स्वच्छ करून निरपेक्ष असा बुध्दाचा धम्म दिला आहे. जीवनाच सोनं करणारा हा सन्मार्ग आहे. उन्हं, वादळवारा, पाऊसधारा अंगावर

झेलणारा वटवृक्ष जणू उन्मळून पडावा तेव्हा त्या झांडावरील आश्रयाला आसपासच्या अनेकानेक जीवांची पशु पक्ष्यांची काय तारांबळ उडाली असेल ? अशीच अवस्था बाबा, गेल्यावर झाली नसेल का? आपल्या कोट्यावधी समाजबांधवाच्या जीवनांचा शिल्पकार बाबासाहेब आहेत. जीवनाला नवा आयाम आणि अर्थ देणारे बाबासाहेबच! आज त्यांच्या पश्चात आमची फार मोठी नैतिक जबाबदारी आहे. काळाच्या मर्यादेत हे कार्य आपणास पार पाडावे लागते. आम्ही सजग असण्याची फार मोठी गरज आहे. किती दिवस फक्त जयजयकार करणार आहोत. कारण आज वर्तमान स्थितीत तत्कालीन काळात बाबासाहेबांना पाण्यात बघणारे लोक आज त्यांच्या ही ओठात नावापुरते 'बाबासाहेब' आहेत. हा षड्यंत्राचा भाग आम्ही ओळखला पाहिजे. ते 'जय भीम' म्हणतील आम्ही त्यांच्यावर भाळू नये. 'जय भीम बोला आणि किधर भी चलो' असे ते आपल्या पाठीमागे आपणास हिनवतात हे आम्हाला का कळू नये ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही अखंड उर्जा आहे. पोटॅन्शियल आहे. त्यामुळेच तर ते बाबासाहेबांशी संबंधित भावनिक मुद्यांना पुढे करून ह्या समाजाचे नैतिक बळ हरण कसे करता येईल याचे ते मनसुबे रचत असतात. 'विद्यापीठ नामांतर लढा' हा ह्याच मनसुब्याचा भाग होता की, काय? याची आज शंका येते. आंदोलने मोर्चे, धरणे कसे करावीत हे आंबेडकरवाद्यांना कुणी सांगू नये ? कारण आम्हाला त्याची फार मोठी नैतिक आणि लोकशाहीला पूरक अशी पार्श्वभूमी आहे. लोकशाहीच्या मार्गाने लढे सुरू राहिले पाहिजेत. तेथेही दिशाहीनता पाहायला मिळत आहे. आणि ते योग्य नाही. आंबेडकरवादी युवा कधीही भरकटू नये त्यांनी बाबासाहेबांच्या विचार, तत्व अंगीकारून आपली वाटचाल करावी. त्याला कोंडीत पकडण्यासाठी विचलित होण्यासाठी, यंत्रनेनी पाश लावून ठेवले आहेत. आरक्षणाच्या तत्वाला जवळ-जवळ छेद दिल्या गेला आहे. सुशिक्षित बेकारांची संख्या कळसाला पोचली आहे. बेरोजगारीचा भस्मासूर माजला आहे. सांस्कृतिक दहशतवाद बोकाळतो आहे. काळ मोठा कठीण आला आहे. प्रतिक्रांतीची गेल्या एका दशकापासून तर जोरदार सुरवात झाली आहे. आंबेडकरवाद्यांसाठी तर हे फार मोठे आव्हान आहे. त्यांच्या खेळ्या, षडयंत्र, त्यांची मनसुबे आपण हानून पाडले पाहिजेत. ती कृती दिसत नाही. उजव्या विचारांचे स्वतःला सनातनी म्हणवून घेणारे त्यांच्यातील काही लोक उघडपणे भारताचे भूषण प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आपत्तीजनक टीका करीत आहेत. 'भारतीय संविधान' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या कष्टाने, आपल्या प्रकृतिची चिंता न करता लिहिले त्यासंदर्भातले जवळपास सर्वच पुरावे उपलब्ध असतांना व स्वतः जवाहरलाल नेहरू तथा मसुदा समितीमध्ये स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष होते. इतर सदस्यांनी त्यांना सहकार्य केले नाही तरी त्यांनी स्वतः राष्ट्रीय कार्य म्हणून सर्व जबाबदारी स्वीकारून या देशाचं संविधान लिहिले ह्या संदर्भातले पुरावे उपलब्ध आहे. त्यांनी स्वतः ते बोलून दाखविले आहे. ते राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार असल्याचा निर्वाळा स्वतः संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद देतात. पं. नेहरू त्याबद्दल बाबासाहेबांचे आभार मानतात. इतरही सदस्य बाबासाहेबांनीच कशी घटना लिहिली हे बोलून दाखवतात. ते सूर्यसत्य आहे. तरीही काही उपटसुंभे, जातीय मानसिकितेने पीडित असलेले मिश्रा सारखे जातीवादी त्यावर आक्षेप घेतात चित्र उपलब्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः लिखित संविधान डॉ. राजेंद्र प्रसाद, पं. नेहरू, सरदार पटेल, मौलान कलाम इ. च्या हाती सुपूर्द करीत आहेत. त्या अनिल मिश्राचे काय डोळे फुटलेत का? ते बघ न म्हणावं जरा नीट ! हा आम्हाला उचकविण्याचा प्रयत्न आहे हे आम्ही ओळखले पाहिजे. खरचं अभ्यासांती सांगतो आपण भरकटत आहोत योग्य दिशेने आपली वाटचाल दिसत नाही. कृतिशील कार्यक्रम नाही. खापऱ्या महारांची संख्या वाढली आहे. आपण योग्य कामे करण्याऱ्यांना नावे ठेवण्यात कुठेच कमी पडत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आम्ही संविधानाविषयी जागृत असलेच पाहिजे परंतु त्याचा उदो उदो नको. बाबासाहेबांचाही उदो उदो नको आणि नेमकं तेच काम मोठ्या प्रमाणावर होताना

दिसत आहे. एकशे चाळीस कोटी भारतीय जनतेच्या किती टक्के लोकांनी संविधानाचा जागर, जागृती कार्यक्रम केला ? आणि ज्यानी कुणी सहभाग घेतला त्यामध्ये काय दिसून आले ? संविधानाचा फक्त गौरव ! अंमलबजावणीच्या नावाने बोंबने 'घर घर संविधान' असा काहीतरी कार्यक्रम आहे हा फेल कार्यक्रम आहे, अर्धवट आहे का तर आजार मनाला आहे; हृदयात आहे आणि औषध गुडघ्याला म्हणजे संविधान समजून घेण्याची मोठी गरज जबाबदारी केंद्र शासन, घटकराज्ये सरकारे आणि शासन-प्रशासनाची आहे त्यांनी कार्यशाळा घ्याव्यात व अंमलबजावणी करावी पण चित्र उलटे आहे. संविधानाची पूजा करून भक्ती करून जमणार आहे का ? मागे आमच्या भारतीय प्रधानमंत्र्याने संविधानाच्या शासकीय प्रत असलेल्या संविधानावर आपला माथा टेकवला एकदा तर माननीय प्रधानमंत्र्यानी संसदेच्या पायऱ्यावर साष्टांग दंडवत घातला. हा काय नाटकी प्रकार आहे हे काय दैवतीकरण आहे ? हे सारं करून संविधानाची पायमल्ली राजरोस सुरू आहे. हे फक्त आंबेकडरवाद्याना समजून उपयोगाचे नाही तर बहुतांशी जनतेच्या हे लक्षात आले पाहिजे. आंबेडकरवाद्यानी तर असले मनसुबे उधळून लावले पाहिजे.

आपण इव्हेन्ट करण्यामध्ये मश्गुल आहोत. वर्तमानाचे भान आपणाला असले पाहिजे. सोशल मिडियावर सोलापूर जिल्ह्यात सव्वीस नोव्हेंबर संविधाना संदर्भात एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या एक व्यक्ती बाबासाहेबांच नाव घेऊन सविंधानाच्या कार्यक्रमात उपस्थित रहावे असे आवाहन करीत होता. संविधान आपणाला वाचवायचे आहे. काही महाभाग तर संविधान सुरक्षा अभियान राबवित आहेत. हे दिशाहीनतेचे लक्षण आहे. तुम्ही, आपण सुरक्षा कशीर करणार ? संविधान काय तुमच्या माझ्या हातात आहे की त्याला तिजोरीत बंद करून ठेवल्याने ते सुरक्षित राहणार आहे ? संविधानाच्या सुरक्षितेसाठी आपणाला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्तरावर काम करावे लागेल. शक्ती बनवावी लागेल आणि बाबासाहेबांनी बोट केलेल्या दिशेनी कूच करावी लागेल? त्यासाठी कार्यक्रम करा. कार्यक्रमासाठी

कार्यक्रम नको तर उद्देशासाठी कार्यक्रम असावा ते करा. दीक्षाभूमीवर सोहळा असेल, दोन अडीच महिने चालणाऱ्या भीम जयंत्या असतील, धम्मपरिषदा असतील किंवा डॉ. बाबासाहेबांचा लाखोंच्या संख्येने उपस्थित होत असलेल्या चैत्यभूमीवरचा तो अफाट जनसागर बाबासाहेबांच्या दिशानिर्देशानुसार पुढे जावा ही एक मनस्वी अपेक्षा आहे कारण वर्तमान भयावह आहे.

डॉ. बाबासाहेबांची निर्मिती ही आपली निर्मिती आहे त्याच जतन, संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांनी उभ्या केलेल्या संस्था, संघटना असतील, पक्ष असतील त्याची दुर्दशा पाहतात मन हेलावून जावे आणि आज आम्ही हे कोसळतांनी बघतो आहे त्यासारखं वाईट काय असू शकते.

प्रज्ञापुरूष 'निर्वाण' पदाला प्राप्त होत असतात. ते गेले आणि त्यांच्या अनुयायांसह संबंध भारत देश शोकसागरात बुडाला. देशाच्या संसदेचे काम काज पूर्णतः बंद ठेवण्यात आले. दुखवटा जाहीर करण्यात आला. पं. नेहरू सहीत मंत्रिमंडळातील अनेक नेते बाबासाहेबांच्या जाण्याने गहिवरलेले. त्यांचे वैचारिक विरोधी टीकाकारही स्तब्ध झाले. संसदेचे सदस्य काकासाहेब गाडगीळ यानी डॉ. आंबेडकर यांच्याशी माझी पस्तीश वर्षाची मैत्री होती असा उल्लेख करून ते पुढे म्हणतात. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द बोलतात ते हिंदूना कडवट भाषणांनी हैराण करीत होते. तथापि ते अंतःकरणाचे थोर उदार होते. त्यांच्या दुख वट्याचा ठराव त्यांच्या कुटुंबियाकडे पाठवा अशी मी विनंती करतो. त्यावेळच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' व मराठीतल्या तसेच प्रादेशिक भाषेतल्या जगप्रसिध्द अनेक दैनिकात व नियतकालिकामध्ये डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणाची दखल घेण्यात आलेली होती. 'मॅचिस्टर गार्डियन, द न्युयॉर्क टाइम्स' ह्या जगप्रसिध्द वृत्तपत्रातले उल्लेख आहेत. डॉ. बाबासाहेबांना त्यांनी सात डिसेंबरला लिहिले होते. ञी. इ.ठ. ालशवज्ञरी उहराळिप ेष ींहश खपवळरप ऊशर्शिीशव उश्रींशी असा डॉ. बाबासाहेबांचा निर्वाणाची लौकिक होता. ही आंतरराष्ट्रीय ख्याती झाली. त्यावेळचे

संस्कृतभाषेची पंडित समजले जाणारे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे नाव तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे बाबासाहेबा विषयी म्हणता, आंबेडकरांचा संताप रास्त होता. त्याबद्दल न्यायी मनुष्य त्याला दोष देवू शकत नाही. बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ती अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, इतिहासाचा विव्दान अभ्यासक अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक ग्रंथकार, निधड्या छातीच्या व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या अथवार कार्याचा संदेश सर्व जगात पसरविणारा पददलितांचे स्फूर्ति आणि आशास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र भावे आम्हा सर्वांची श्रध्दांजली. अशा अनेकानेक ताज्या शोकभावना तेव्हा व्यक्त केल्या आहेत. ज्या 'केसरी' ने बाबासाहेबांची दोन बोटाची बातमी छापली नाही त्या 'केसरी' ने सुध्दा 'स्वतंत्र्य प्रज्ञेचा थोर नेता' हे शीर्षक देऊन आपल्या 'केसरी' ने भावना व्यक्त केल्या. डॉ. बाबासाहेब हे अंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त नाव होते आणि आहे हे शपथेवर सांगायची गरज नाही. आज घडीला वर्तमानाची धग लक्षात घेता आपण कार्यप्रवण झाले पाहिजे हेच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना योग्य ते अभिवादन होईल.

संदर्भ :
१. आर.डी. गायकवाड, आंबेडकरी चळवळीच्या आठवणी.
२. चां. भ. खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, चरित्र खंड-१२.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक समता, मानवी अधिकार आणि लोकशाहीचे शिल्पकार होते. प्रतिकूल परिस्थितीत जन्मून त्यांनी शिक्षणाला शस्त्र बनवून जागतिक दर्जाच्या विद्यापीठांत उच्च शिक्षण संपादन केले. अस्पृश्यता, जातीय छळ आणि भेदभावाविरुद्ध त्यांनी आयुष्यभर निर्णायक संघर्ष केला. भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार म्हणून त्यांनी स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुता या मूल्यांची भक्कम मांडणी केली. अर्थतज्ज्ञ म्हणून भारताच्या कामगार कायदे, वित्तीय नियोजन आणि औद्योगिक विकासात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं. सामाजिक सुधारणेसाठी त्यांनी स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाचा प्रसार आणि तर्कशुद्ध विचारसरणीचा आग्रह धरला. शोषित-वंचितांच्या उन्नतीसाठी त्यांनी कायदे, चळवळी आणि लेखनाद्वारे सतत जागृती केली. जातीय अन्यायाच्या मूलाशी प्रहार करत अखेर त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून समाज परिवर्तनाची नवी दिशा दिली. ६ डिसेंबर या दिवशी त्यांच्या पुण्यतिथीला देश कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो, कारण त्यांनी दिलेली मूल्यं राष्ट्राच्या प्रगतीचा दीपस्तंभ आहेत. आजही बाबासाहेबांचे विचार आणि कार्य भारताच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाचे प्रमुख मार्गदर्शक आहेत.

– डॉ. भारत कऱ्हाड

महामानवाच्या स्मृतीतून मनाला भिडणारा महापरिनिर्वाण दिन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

६ डिसेंबर हा भारतीय इतिहासातील एक भावस्पर्शी, चिंतनशील आणि आत्मपरीक्षणाचा दिवस. हा फक्त एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा दिवस नाही; हा त्या महामानवाच्या विचारज्योतीचा पुनर्जन्मदिन आहे. हा दिवस मानवी स्वाभिमानाची, लोकशाही संस्कृतीची आणि सामाजिक परिवर्तनाची आठवण करून देणारा दिवस आहे. हा दिवस कॅलेंडरवरील फक्त एक दिवस नाही. तो एका महामानवाच्या देहपरीत्यागाचा क्षण असला, तरी त्याच क्षणी त्याच्या विचारांचा जन्म झाला; विचारांच्या क्रांतीची अक्षय ज्योत प्रज्वलित झाली. हा दिवस केवळ शोकाचा नाही; तो अंतर्मनाची जागृती, समाजपरिवर्तनाचा संकल्प आणि लोकशाही संस्कृतीच्या आत्म परीक्षणाचा दिवस आहे. हा दिवस केवळ बाबासाहेबांच्या स्मृतींचा दिवस नसून, न्याय, समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांना नव्याने जागवणारा दिवस आहे. हा दिवस भारतीय समाजाला आत्मचिंतनाची, जागृतीची आणि कृतज्ञतेची साक्ष देणारा 'महापरिनिर्वाण दिन' म्हणून साजरा केला जातो. महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नाही, तर संकल्पाचा दिवस आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याचा संकल्प, अंधश्रद्धा, असमानता आणि वर्णभेद मोडून काढण्याचा संकल्प आणि शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा या मंत्राला कृतीत आणण्याचा संकल्प. शिक्षण हेच परिवर्तनाचे शस्त्र, अन्यायाविरुद्ध संघर्षाची ठाम भूमिका आणि संघटित समाज हीच खरी ताकद आहे. बाबासाहेब गेले, पण त्यांचे विचार अमर झाले म्हणूनच 'महापरिनिर्वाण' म्हणजे अंत नव्हे, तर एका विचारक्रांतीचा नवा आरंभ!

बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका महान नेत्याचे नव्हे, तर विचारांचे विश्व होते. गरीब, वंचित, बहिष्कृत आणि शोषित समाजाला त्यांनी कायद्याचा आधार दिला, शिक्षणाची ताकद दिली आणि जगण्याचा स्वाभिमान दिला. मी जन्मलो अंधारात, पण संघर्षाच्या प्रकाशाने जग उजळून टाकले, ही केवळ त्यांची कथा नाही, तर संपूर्ण भारतीय समाजाची नवचैतन्याची कहाणी आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे फक्त कायद्यांचे पुस्तक नाही, ते मानवतेचे पवित्र ग्रंथ, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे चार अतूट स्तंभ आहेत. ते फक्त वाचायचे नाहीत, ते जगायचे आहेत. पण आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, आपण या मूल्यांना खरंच जगत आहोत का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दोन गोष्टी दिल्या, एक म्हणजे जागृक बुद्धी आणि दुसरी म्हणजे जागृत वैचारिक जबाबदारी. आज आपण त्यांना श्रद्धांजली वाहतो तेव्हा फुलांच्या हारात ते समाधानी नसतात; ते समाधानी असतात, जेव्हा आपण त्यांच्या विचारांच्या अंगाऱ्याला कृतीच्या श्वासाने तेज देतो. फुले आणि शब्द वाहून चालणार नाही; विचारांची कृतीमय वाहतूक ही खरी अभिवादनमय श्रद्धांजली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला कायदे, अधिकार आणि स्वाभिमान दिला. त्यांनी केवळ समाजाच्या उपेक्षित, शोषित घटकांना आवाज दिला नाही, तर संपूर्ण भारताला 'मानव म्हणून जगण्याची कला' शिकवली. त्यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि संघर्ष आजही प्रकाशस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. त्यांचे जीवन मुठीत माती घेऊन सुरू झाले पण त्या मातीला त्यांनी ज्ञानाच्या सुवर्णकणांनी समृद्ध केले. जगभरातील ४० दशलक्षांहून अधिक गुलाम मनांना त्यांनी विचारांचा उधाण दिला. जन्मानं हीन, पण कर्मानं महान होण्याची प्रेरणा त्यांनी दिली, शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा, हीच महानायकाची अखेरची शिकवण. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, संघर्ष आणि स्वाभिमानाची जिवंत शाळा. ते म्हणाले होतेमला माझ्या मृत्यूनंतर पाहायचे असेल, तर माझ्या समाधीवर येऊ नका; माझ्या विचारांकडे पाहा, माझ्या पुस्तकांकडे पाहा, माझ्या संघर्षाकडे पाहा, कारण तिथेच मी जिवंत आहे!

– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

६ डिसेंबरला आपण लाखोंच्या संख्येने मुंबईतील चैत्यभूमीवर जमा होतो; मेणबत्त्या लावतो, पण आपण अंतर्मनात विचारांची ज्योत पेटवतो का? बाबासाहेबांच्या समाधीवर मेणबत्त्या लावतालावता आपण आपल्या अंतर्मनातील मेणबत्ती प्रज्वलित करतो का? ६ डिसेंबर आपल्याला एक प्रश्न विचारतो, आपण बाबासाहेबांना फक्त वंदन करतो, की त्यांच्या विचारांची वंदनीय कृती करतो? आपण समाज बदलतो की समाजाकडून फक्त भावनिक शब्द घेतो? त्यांनी दिलेल्या संविधानाच्या दिव्यज्योती भोवती आपण सजावट करतो की त्या ज्योतीने अंधारात प्रकाश आणतो? मृत्यू एखाद्या व्यक्तीचा होतो, पण विचार अमर होतो. डॉ. आंबेडकर देहाने गेले, पण त्यांनी दिलेला संविधानाचा श्वास आजही जिवंत आहे. त्यांची बौद्ध धम्माकडे झेप, ही आध्यात्मिक नाही; ती मानवी प्रतिष्ठेची समानतेची क्रांती होती हीच महामानव आणि आपली जाणीव आहे. त्यांनी शेवटी म्हटलं होतं, मी हिंदू म्हणून मारणार नाही हे धार्मिक वाक्य नव्हतं, ते मानवी अस्मितेचं घोषणापत्र होतं. आजची अत्यंत गरज आहे बाबासाहेबांना समजून घेणे, फक्त पाठ करणे नाही. समाजाला मसिहा नको, समाजाला मार्गदर्शक हवा. देणाऱ्याला देव बनवून थांबू नका तर त्याचा विचार देवत्वाने जगवा. बाबासाहेबांची शिकवण तांत्रिक नाही; ती जीवनतत्त्वज्ञान आहे. ती तत्त्वज्ञान फक्त उधृत केल्याने नाही, तर जगल्याने प्रभावी होते.

आज विषमता, धार्मिक कट्टरता, जातीगत द्वेष, आर्थिक अन्याय पुन्हा समाजाला जखडू पाहत आहेत. अशा वेळी बाबासाहेब जागृत स्वरात आपल्याला आठवण करून देतात राजकीय स्वातंत्र्य व्यर्थ आहे, जोपर्यंत सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही. आजच्या परिस्थितीत हे वाक्य विशेषतः ठामपणे जाणवते. बाबासाहेब म्हणाले होते, मी ज्या समाजासाठी लढलो, तो समाज जर झोपला तर माझे कार्य अपूर्ण राहील. म्हणूनच आज ६ डिसेंबरच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांचा दीप पुन्हा प्रज्वलित करू या. आज बाबासाहेबांची गरज पुतळ्यांत नाही, तर मनांत आहे. त्यांच्या विचारांची गरज केवळ ग्रंथांत नाही, तर कृतीत आहे. त्यांच्या लोकशाहीची गरज केवळ संविधानात नाही, तर समाजव्यवस्थेत आहे. महापरिनिर्वाण दिन हा स्मरणाचा नव्हे, संकल्पाचा दिवस आहे. मी जातभेद मोडीन, समतेची वीट बनेन, मी संविधान फक्त वाचणार नाही, तर त्याचा रक्षक बनणार तसेच, मी बाबासाहेबांना स्मरणार नाही तर त्यांच्या विचारांना स्मरणीय करीन, हीच आजची आजची सशक्त प्रतिज्ञा आहे. म्हणून त्यांची शेवटची ओळ जो प्रत्येकाने मनात कोरावी, बाबासाहेबांनी आपल्याला मुक्त केले, पण मुक्ततेची किंमत आपण जपू शकतो का? खरी प्रतिज्ञा अशी असावी. ही जाणीव, ही जागृती, ही जबाबदारी, यालाच आपण म्हणू शकतो महापरिनिर्वाणाची खरी श्रद्धांजली! आज डॉ. आंबेडकर आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार आपल्यात आहेत. ते विचार आपल्याला सजग करतात, सशक्त करतात, आणि माणूस म्हणून जगण्याची कला शिकवतात. ज्या समाजात मनुष्य मनुष्याचा शत्रू नाही, ज्या समाजात बंधुता हीच खरी संपत्ती आहे, असा समाज घडवण्याचे स्वप्न बाबासाहेबांचे होते. हे स्वप्न जगणे, जपणे आणि पुढील पिढीकडे पोहाचवणे हेच खरे महापरिनिर्वाण! विचार अमर आहेत. मेणबत्तीच्या प्रकाशापेक्षा अंतर्मनाचा प्रकाश उजळवू या. महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भावपूर्ण आदरांजली !

अवैद्य वाळू उपशावर उपविभागीय कार्यालय तसेच पंढरपूर शहर पोलीस यांची मोठी कारवाई

एक जेसीबी, टिपर वाळूसह एक स्विफ्ट कार असा एकूण ५२ लाख ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
पंढरपूर/प्रतिनिधीं

आज दिनांक ५/ १२ /२०२५ रोजी श्री प्रशांत डगळे सो.सहा. पोलीस अधीक्षक, पंढरपूर उपविभाग पंढरपूर, यांच्या गोपनीय माहितीच्या आधारे, बातमी मिळाली की काही इसमाने पंढरपूर शहर परिसरात इस बावी परिसरामध्ये बावन एकर परिसरामध्ये जाणाऱ्या सिमेंट रोडच्या पूर्वेकडील जाणाऱ्या असणाऱ्या मोकळ्या मैदानात झुडपाच्या आडोशाला काही अंतरावर मोकळ्या जागेमध्ये भीमा नदीपात्रातून अवैद्य वाळू उपसा व त्या वाळूचा साठा केला आहे. अशी बातमी मिळाल्याने पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी व कार्यालयातील हेड कॉन्स्टेबल १८६ निलेश रोंगे, पोना/. ४२७ विनोद सुग्रीव शिंदे, व पोको/२१ १० शिवशंकर हुलजंती, असे संबंधित ठिकाण जाऊन बातमीतील अशा प्रमाणे खात्री केली. त्या ठिकाणी रेखी करण्यासाठी लाल रंगाचे शिफ्ट गाडी वाहनांच्या शेजारी दोन ते तीन इसम उभे होते. थोड्यावेळाने त्या ठिकाणी एक टिप्पर आला व जेसीबीच्या साह्याने वाळू भरण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशय आलेले जेसीबी ड्रायव्हर व टिप्पर ड्रायव्हर वगळता इतर दोघजण रेखी करणारे लाल रंगाच्या शिफ्ट कार मधून पळून जात होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा इशारा केला. त्यांनी वाहन थांबवता पळून गेले, त्यावेळी टिप्पर ड्रायव्हर व जेसीबी ड्रायव्हर यांना पकडले व काही वेळाने पंढरपूर शहर पोलिसांनी पोशाही पिसाळ, पोलीस कॉन्स्टेबल

धनाजी मुटकुळे,पोहवा. विनोद चौगुले यांनी वाटला करून लाल रंगाची शिफ्ट कार पकडल त्यातील चालक व दुसऱ्या इसमास जाग्यावरच पकडले. त्यास त्याचे नाव व पत्ता बाबत विचारले असता त्यांनी त्यांची नावे (१ सिद्धनाथ भागवत इंगोले राहणार गादेगाव, तालुका पंढरपूर असे सांगितले. लाल रंगाची शिफ्ट कार व टिपरवानाची मालकाबाबत विचारणा केली असता.२) महेश तानाजी शिंदे राहणार इस बावी, असे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच येथे पकडण्यात आलेला जेसीबी ड्रायव्हर ट्रिपल ड्रायव्हर यांना त्याचे नाव पत्ता विचारणा केले.३) हनुमंत धनाजी जाधव राहणार वाखरी, तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर,४) परमेश्वर महादेव माने राहणार बोहाळीतालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर, असे असल्याचे सांगितले.

घटनास्थळावरून मिळून आलेली वाहनाचे व मध्यमालाचे वर्णन खालील प्रमाणे. १)२५,००,०००/ पिवळ्या रंगाचा जेसीबी विना नंबरचा. २)२०,२४०००/टाटा कंपनीचा पांढरा रंगाचा हायवा टिपर विना नंबरचा सुमारे त्यामध्ये चार ब्रास वाळू. ३)०७,०,०००० /लाल रंगाची शिफ्ट कार विना नंबरची जुवा. कि.अ.१०,०००/सॅमसंग कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल जु.वा. कि.अ.५२,३४०००० /असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वसई श्रीकांत धुगरकर करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सो.(भा.पो.से.) अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर,सो. उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर उपविभाग श्री प्रशांत डगळे,सो. (भा.पो.से.) वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके सो. यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयाकडील पोलीस हेडकॉन्स्टेबल१८६/निलेश रोंगे, पो.ना/४२७. विनोद सुग्रीव शिंदे,पो.को./२११० शिवशंकर हुलजंती,पोका./राहुल लोंढे, पंढरपूर शहर पोलीस ठाण्याकडील पोसाई, पिसाळ. पोलीस कॉन्स्टेबल धनाजी मुटकुळे, विनोद चौगुले यांनी केली आहे.

कळंब येथे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगाचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब: प्रतिनिधि,सुधाकर रणदिवे : दिव्यांगात्वर जिद्दीने व मात करीत उत्साहाने आपली सेवा सातत्य असलेले दिव्यांग बंधुंचा सत्कार दिव्यांग दिनानिमित्त करण्यात आला. यामध्ये सतकाराम ध्ये स्वप्नपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक व कॉम्प्युटर ऑपरेटर असलेले राज हजारे , पत्रकार व कुरियर , नेट कॅफे चे संचालक अशोक कुलकर्णी, उषा प्रिंटिंग प्रेस येथे कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून सेवेत असलेले गणेश शिंदे यांचा शाल पुष्पहार देऊन ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष, महादेव महाराज अडसूळ, स्वप्नपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल माने, धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे , व्याख्याते महादेव खराटे , माधवसिंग राजपूत, मुख्याध्यापक बाबासाहेब कांबळे यांनी सत्कार केला. व दिव्यांग दिनानिमित्त त्यांच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

सारोळा मांडवा येथे प्रलंबित अनुदान ईकेवायसी करता विशेष शिबिराचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब: प्रतिनिधि,सुधाकर रणदिवे : ऑगस्ट सप्टेंबर मध्ये अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान, मदत अनुदान यादी शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या होत्या परंतु त्यातील काही सामायिक खातेदार,मयत वारसा खातेदार, स्थलांतरित खातेदार हे काही तांत्रिक अडचणीमुळे फार्मर आयडी प्रलंबित असल्यामुळे अनुदान वितरणास विलंब लागत होता. परंतु नुकतीच शासनाने ईकेवायसी साईट सुरू झाल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या शेतकऱ्यांनी तत्काळ ई केवायसी पूर्ण करून घ्यावी. तसेच मयत खातेदारांच्या वारसांनी तात्काळ वारस फेरफार करून घ्यावे. असे शेतकऱ्यांना आवाहन सारोळा मांडवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही. सिरसेवाड पाटील यांनी केले आहे.

महिलांनी स्वत:चा व्यवसाय सुरू करून उद्योगवर्धिनी व्हावे : प्रमिला उबाळे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : फक्त चूल आणि मूल एवढ्यापुरते आयुष्य मर्यादित न ठेवता महिलांनी घराबाहेर पडून आत्मनिर्भरतेचे धडे गिरवावेत. वाढत्या महागाईच्या काळात कुटुंबाचा आर्थिक भार व्यवस्थित सांभाळायचा असेल तर नवरा-बायको दोघांनीही उत्पन्नाचे स्रोत निर्माण केले पाहिजेत. मुलांचे दर्जेदार शिक्षण, स्वतःचे पक्के घर, स्वयंचलित वाहने आणि आधुनिक सुविधा मिळवायच्या असतील तर कुटुंबाची आर्थिक उंची वाढणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच महिलांनी स्वयंरोजगाराचे कौशल्य आत्मसात करून स्वतःचा व्यवसाय उभारावा आणि उद्योगवर्धिनी व्हावे, असे प्रतिपादन प्रेरणा सामाजिक संस्थाच्या संस्थापिका प्रमिला उबाळे यांनी केले.

महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरात विविध वस्तू तयार करण्याचे मार्गदर्शन करताना प्रशिक्षिका लक्ष्मीताई कुरलेकर व बचत गटातील महिला सहभागी.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया - सोलापूर शाखेच्या वूमन अँड जेंडर एम्पॉवरमेंट विभागांतर्गत आणि प्रेरणा सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

महिला आत्मनिर्भरतेसाठी व प्रशिक्षण शिबिरे ही एक चळवळ बनावी या उद्देशाने मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू आणि डायरेक्टर - जेंडर अँड राइट्स निशा जगदीश यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरातील विविध भागात व्यवसाय प्रशिक्षण शिबिरे होत असल्याची माहिती प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिली. यावेळी शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली हे उपस्थित होते.

या अंतर्गत सिव्हिल हॉस्पिटल चौक परिसरातील राहुल गांधी झोपडपट्टी व घिसाडी वस्ती येथील बचत गटांच्या महिलांसाठी चार दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षिका लक्ष्मीताई कुरलेकर यांनी सेंट, अत्तर, उदबत्ती, मेणबत्त्या, शोभेच्या वस्तू, लोकरीचे पडदे, कापडी व कागदी पिशव्या, शोभेचे हँगिंग आरसे, पायपुसण्या आणि साडीचे गोंडे अशा विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. एकूण ४० महिलांनी या शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवून व्यवसायाचे धडे आत्मसात केले.

कार्यक्रमाचे स्वागत आकाश गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन रोजमेरी गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुकेशिनी सोनकांबळे यांनी मानले.

वाडी वाघोली रोड बनले डेंजर क्षेत्र!; पहिल्या आमदाराने केले नाही, दुसरेही आमदार चिडीचिप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुरुड:- प्रतिनीधी सुधाकर रणदिवे,लातूर ग्रामीण भागातील मुरुड जवळून १२ किलोमीटर अंतरावरील वाडी वाघोली हे पुनःवशित गाव.या आहेत गावाच्या आसपास शेतीक्षेत्र हजारो एकर आहे.ऊसाचा शिवार म्हणून आळखला जाणारा हा पट्टा आहे. परंतु गाव वसल्या नंतर जो रोड झाला.त्या नंतर आजतागायत त्या गावाला रोड झाला नाही.म्हणतात मधल्या काळात कोणीतरी प्रयत्न केला.पण त्या रोडचे काम झाले नाही.

युवा भिम सेनेच्या माध्यमातून प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन समाजसेवक यांनी दंडवत आंदोलन केले भिसे वाघोली वाडीवाघोली ते माटेफळ रोडपर्यंत हे दंडवत घेत आंदोलन केले.परंतू साईडची झाडी,झुडपाडे काढून थातूरमातूर मुरुम भरण्याचे काम केले.आज ऊसाने भरलेले ट्रक, ट्रॅक्टर ट्रॉल्या पलटी होत आहेत.या अपघातात चालक जखमी होत आहेत.आजपर्यंत बरेच शेतकरी पुरुष महिला जखमी झालेले उदाहरण आहेत.

तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही.अथवा स्थानिक आमदार ही दखल घेत नाहीत.

अशी हेळसांड जनतेची शेतकऱ्यांची होत आहे.याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास पुढे मोठे आंदोलन छेडले जाईल अशी प्रतिक्रिया युवा भिम सेना संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे यांनी प्रतिनिधीशीं बोलताना दिली.

विहीर खुली करण्याची पत्रकार मिलिंद जाधव यांची मागणी — **स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली तीव्र नाराजी**

पडघ्यातील सतीची विहीर बुजवली; डॉ. बाबासाहेबांच्या पाऊलखुणा पुसण्याचा प्रयत्न?

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघे गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या ऐतिहासिक पाणी सत्याग्रहाची साक्ष देणारी १०० वर्षे जुनी सर्वे नं. ७९/१० मधील सतीची विहीर बुजवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त या घटनेवर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून या संदर्भात पत्रकार मिलिंद जाधव यांनी मुंबई, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, ठाणे जिल्हाधिकारी, भिवंडी प्रांताधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन

कारवाईची मागणी केली आहे.

पडघा ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे नं. ७९/१० मधील सतीची विहीर जवळपास १०० वर्ष जुनी असून त्याच सतीच्या विहिरीवरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाणी सत्याग्रह केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघे ,समतानगर येथे काशिनाथ हाशाबा दोंदे यांच्या घरी उतरले होते. याच काळात सतीची विहीर निवडून येथे सत्याग्रहींसह पाणी काढण्यात आले होते. या घटनेचा उल्लेख 'ठाणे संघसरिता' या पुस्तकात स्पष्टपणे करण्यात आला आहे.

आम्ही लहान होतो, तेव्हा डॉ.बाबासाहेब पडघ्यात आले होते. सतीच्या विहिरीवर त्यांनी पाणी सत्याग्रह केला. एका शिसवीच्या झाडाखाली त्यांची मोठी सभा झाली होती. 'मुलांना शिक्षण द्या' असा संदेश त्यांनी आम्हाला दिला होता.समतानगर मधील काशिनाथ दोंदे यांच्या घरी उतरले होते. तर चहा पाणी घेतला होता. अशी आठवण समतानगर येथील हिराबाई दुंदांजी सोनावणे (वय ९५) यांनी सांगितली.

सतीची विहीर वाचवण्यासाठी गेल्या २० वर्षांपासून लढा देत असून,पडघा ग्रामपंचायतीला वारंवार

तक्रारी करूनही काहीच कारवाई होत नाही .अनेक अधिकाऱ्यांच्या संगनमताने या जागेत व्यवहार करण्यात आल्याची शंका आहे.असा गंभीर आरोप पडघा येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद साने (वय ७९) यांनी केला आहे. या संदर्भात पडघा मंडळ अधिकारी संतोष आगविले यांच्याशी संपर्क साधला असता या सतीच्या विहिरी बद्दल यापूर्वीही २०१९ मध्ये चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर केला . तसेच दोन दिवसांपूर्वीच पुन्हा माझ्याकडे तक्रार अर्ज आला असून त्या अर्जावर मंगळवारी सुनावणी घेऊन पुढील चौकशी करणार असल्याचेही सांगितले. डॉ. बाबासाहेबांनी पदस्पर्श केलेली ही विहीर आमच्या पडघ्याचा अभिमान आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पाऊलखुणा पुसू देणार नाही इतिहास पुसण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. विहीर पुन्हा उघडी करण्यासाठी माझा लढा कायम राहील.असे पत्रकार मिलिंद जाधव यांनी बोलतांना सांगितले.

शासन ही घटना गांभीर्याने घेणार का? ही ऐतिहासिक विहीर पुन्हा उघडली जाणार का? की डॉ. बाबासाहेबांच्या पडघ्याशी निगडित अमूल्य पाऊलखुणा कायमच्या पुसल्या जाणार? या प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.